पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८००** **दिनांक - १०/११/२०२३**

## भारती विद्यापीठ पोलीस ठाणे पुणे शहर

## दरोडयाच्या पूर्वतयारीत असलेल्या सराईत गुन्हेगाराची टोळी जेरबंद त्यांचेकडुन ०२ पिस्टल ०५ राऊंडसह ०३,९८,०१०/- रुपये किमंतीचा मुददेमाल हस्तगत

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन हददीतील त्रिमूर्ती चौक,भारती विद्यापीठ,पुणे येथे दिवाळी सणानिमीत्त सोने खरेदीकरीता नागरिकांची गर्दी होत असल्याने,सदर परिसराची रेकी करुन सिंहगड रोड पोलीस स्टेशन व भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील गुन्हेगार सराफाला लुटणार असल्याची गुप्त माहिती गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांना मिळाली.

त्याप्रमाणे भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील गुन्हे शोध पथकाने मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विनायक गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली सापळा रचुन,गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहितीनुसार तीन संशईत मोटर सायकलवर बसुन सराफ पट्टयातून फिरताना दिसले. त्यावेळी त्यांना राजे चौक येथे लागलीच ताब्यात घेवुन,जागीच त्यांची झडती घेतली असता रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे **१)राधेमोहन (मुन्ना) सिताराम पिसे,वय १९ वर्षे,रा.प्रेमा कॉलनी,लेन नंबर ०२,यशोदिप चौक,वारजे-माळवाडी,पुणे २)समीर ज्ञानेश्वर मारणे,वय २० वर्षे,रा.मारणे हाईटस,लेन नंबर ०४,न-हेगाव,पुणे,मुळगाव मु.पो.भोडे,मुठा,ता.मुळशी,पुणे यांचे ताब्यात पाच राऊंडसह दोन लोडेड पिस्टल मिळाल्या आहेत. उर्वरीत आरोपी नामे ३)अर्जुन मोहन बेलदरे,वय २० वर्षे,रा. गणपती मंदीराचे पाठीमागे,आंबेगाव-बुद्रुक,पुणे ४)तुषार दिलीप माने,वय १९ वर्षे,रा. हरणाई कॉम्पलेक्स,भेंडी चौक,आंबेगाव-बुद्रुक,पुणे ५)यश मनोज लोहकरे,वय १९ वर्षे,रा.मातोश्री आंगण,आंबेगाव-पठार,पुणे ६)अनिल दिलीप माने,वय २० वर्षे,रा.हरणाई कॉम्पलेक्स,भेंडी चौक,आंबेगाव-बुद्रुक,पुणे ७)ओंकार ऊर्फ मयुर दादासाहेब माने,वय २० वर्षे,रा.शिवरत्न बिल्डींग,गायमुख चौक,आंबेगाव-बुद्रुक,पुणे यांना अटक केली असुन व दोन विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेवुन,**त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता,आरोपी राधेमोहन (मुन्ना) पिसे याने त्रिमूर्ती चौकातील सराफावर दरोडा टाकणार होतो याची कबुली दिली. तसेच मागील महिन्यात त्याचा गॅग लीडर ओंकार लोहकरे याचे खूनाचा बदला घेण्यासाठी पिस्टल आणले असून,त्याचे गुन्हया मध्ये जामीनाचा खर्चाची जुळवा-जुळव करण्यासाठी सराफाच्या दुकानात साथीदारासह चोरी करणार होतो अशी कबुली दिली आहे. नमुद आरोपी याचे ताब्यातून **०२ पिस्टल ०५ राऊंडसह, ०७ मोबाईल फोन व ०३ मोटार सायकल असा एकुण ०३,९८,०१०/- रु किचा मुददेमाल** हस्तगत करण्यात आला आहे. सदरबाबत **भारती विद्यापीठ पो स्टे ७२३/२०२३,भादंवि कलम ३९९,४०२, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)१३५,आर्म ॲक्ट कलम ३ (२५)** प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन,सदर गुन्हयातील आरोपीतांना अटक करण्यात आली असून,मा.न्यायालयाने त्यांना दि.११/११/२०२३ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे शहर, श्री. प्रवीण कुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०२ पुणे,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग,पुणे,श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पो स्टे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्री.विजय पुराणीक, श्री.गिरीश दिघावकर सपोनि.अमोल रसाळ, पोउनि.धीरज गुप्ता, पोलीस अंमलदार, चेतन गोरे, मंगेश पवार, हर्षल शिंदे, अभिजीत जाधव, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, निलेश खैरमोडे, अभिनय चौधरी, आाशिष गायकवाड, सचिन सरपाले, निलेश जमदाडे, शैलेंद्र साठे, महेश बारावकर, अवधूत जमदाडे, निलेश ढमढेरे, मितेश चोरमोले, राहुल तांबे, विक्रम सावंत यांचे पथकाने केलेली आहे.


पुणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत
महाराष्ट्र पोलीस
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे
दुरध्वनी क्रमांक: ०२०-२४३६५१००
पुणे पोलीस
भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन
पुणे शहर